# स्त्री सुरक्षेचा जागर

आज एकविसाव्या शतकामध्ये मरीसा माईर, हिलरी क्लिंटन, मेलिंडा गेट्स, अरुंधती भट्टाचार्य, सुनीता



**"लाइफ इज़ ब्युटिफूल"**

विल्यम्स यांच्या सारख्या "वूमन आयकॉन्स" आहेत. अनेक क्षेत्रांत महिलांचा वावर सहज आणि आत्मविश्वासपूर्ण झाला आहे. आकाशाला कवेत घेणारी क्षेत्रे स्त्री शक्ती पादाक्रांत करू पाहत आहे. स्त्री संसारासाठी नोकरी करते आणि स्वतंत्र व्यवसायही करते आहे. ती रस्त्यावर उतरून आंदोलन करते अन् वैमानिक होऊन गगनात मुक्त विहारसुद्धा करते आहे. आणि दुसरीकडे स्त्री अजूनही तिचे पंख निर्भयतेने पसरू शकत नाही, ती मोकळेपणाने श्वास घेऊ शकत नाही. ती अजूनही स्वत:वर होणारे अन्याय सहन करत राहते आणि समाजातील Weak Entity म्हणून जगत असते. ती नोकरी करते; पण आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र नाही. ती सर्वांचे आरोग्य जपते; पण स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष द्यायला फुरसतच नसते. ती वैमानिक तर होते; पण ह्या जगात निश्चिंत वावरु शकत नाही.


मला लहानपणापासून भारतभर खूप फिरायला मिळाले. वडील सैन्यात कर्नल असल्यामुळे माझे बालपण भारताच्या विविध प्रांतात गेले. लहानपणातच खूप भारत बघायला मिळाले. आई शिक्षिका असल्यामुळे तिचा आमच्या अभ्यासाकडे विशेष लक्ष असायचे. आम्ही दोन बहिणी. आमच्या घरी आई-वडिलांनी कधीच मुलगा मुलगी भेद केला नाही. माझ्या आई-वडिलांचे आम्हाला एकच सांगणे असायचे की मुलींनी चांगले शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे असले पाहिजे. मी सॉफ्टवेअर इंजिनिअर झाले आणि पुढे नोकरी करू लागले. मी नोकरी करत असताना माझ्या अवतीभोवती असलेल्या स्त्रिया पाहू लागले. स्त्रियांचे विविध पैलू माझ्यासमोर येऊ लागले. संगणक आणि इलेक्ट्रॉनिक्स च्या क्षेत्रात स्त्रियांनी तर खूप प्रगती केली. स्त्री आत्मविश्वासाने घराबाहेर पडू लागली. आणि ती बोर्डरुम मध्ये धडाडीने निर्णयही घेऊ लागली. पण स्त्री अधिकारी असलेल्या ठिकाणी तिच्या हाताखाली काम करणारी पुरुष मंडळी कशी वागतात? आणि कनिष्ठ सहकारी स्त्री असेल तर तिच्याशी पुरुष अधिकारी कसे वागतात?

राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, शाहू महाराज, टिळक, आगरकर, आंबेडकर, महात्मा गांधी, सावरकर अशा अनेक समाजसुधारकांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करून समाजात थोडीफार सुधारणा जरी झाली असली

तरी आजदेखील सर्व व्यवस्थित आहे असे म्हणण्याचेच धाडस होत नाही. आज तरी कुठे मुली "सुरक्षित' आहेत? कुठे त्यांना हक्क आहेत? एकट्या स्त्रीकडे समाज कोणत्या नजरेने पाहतोय? समाजात स्त्रियांवरील अत्याचार कुठे संपले आहेत? स्त्रीला आजही तिच्या अस्तित्वासाठी लढाव लागतंय, शिकलेली कमावती असो किंवा अडाणी.

गेल्या शतकभरातील सर्व चळवळी माणूस म्हणून प्रतिष्ठा मागणाऱ्या होत्या. सामाजिक मानसिकतेत बदल करण्याच्या मागणीसाठी त्या होत्या. स्त्रीप्रतिष्ठा हा केवळ स्त्रीचा प्रश्न कधीच नसतो; समग्र मानव जातीच्या निरामयतेचा अन् स्वास्थ्याचा तो प्रश्न असतो. जगत्जननीच्या पूजे बरोबर स्त्री जातीबद्दल आदर ठेवण्याची मानसिकता तयार होणे अतिशय गरजेचे आहे. मला स्त्रियांवर होणारे अत्याचार सहन होत नाहीत. मुलगा मुलगी भेद करणे तर पटतच नाही. आपल्या पोटी "मुलगी नको' ही संकल्पना पिढ्या न् पिढ्या पुरुषप्रधान संस्कृतीत रुजली. जन्म घेताना बाळाला काय माहिती की ते मुलगी म्हणून जन्म घेणार आहे. मुलींना समान संधि आणि समान हक्क मिळावे असे मला वाटते.

डिसेंबर 2012 मध्ये मी भारतात असताना एके दिवशी "निर्भया गॅंग रेप" ची दिल्लीत घडलेली घटना "ब्रेकिंग न्यूज" मध्ये आली. ह्या बातमीने माझे मन अतिशय सुन्न झाले. सध्या वर्तमानपत्रातील दोन पाने ही स्त्रियांवर होणारे अत्याचार ह्या विषयावर असतात. हे सर्व वाचून मन कुठेतरी रडत होते. एका स्त्रीचे आयुष्य किती अवघड आहे हे जाणवत होते. स्त्रियांच्या हक्कांसाठी आपण काहीतरी करावे असे मला वाटत होते. पण मी काय काम करणार हे समजत नव्हते. काही दिवसांनी एक कल्पना सुचली - आपल्या आर्ट मधून महिलांच्या व्यथा मांडायच्या. मनातले विचार प्रत्यक्षात कागदावर उतरवायला एक वर्ष लागलं.



**"गॅंग रेप"**

समाजातील स्त्रीवर होणारे अगदी तिच्या जन्मापासून ते तिच्या संपूर्ण जीवनात घडणारे वेगवेगळे अत्याचार ह्या वर मी एकूण पंधरा चित्रे काढली. ती क्रमश: अशी आहेत:




"सेव्ह गर्ल", “चाईल्ड अॅब्यूज”, “गँग रेप”, “अॅसिड अॅटॅक”, “डाउरी डेथ”, “वूमन हॅरॅसमेंट”, “डोमेस्टिक व्हायोलन्स”, “वर्कप्लेस हॅरॅसमेंट”, “जेंडर डिस्क्रिमिनेशन”, “हर्ट”, “डिप्रेशन”, “व्हॉट नेक्स्ट”, “हेल्प अस”, “लाइफ इज़ ब्युटिफूल” आणि “होप”. समाजात अजूनही वंशाचा दिवा म्हणून लोकांना मुलगा हवा असतो. अगदी छोट्या खेड्यापाड्यापासून मोठ्या शहरांपर्यन्त स्त्री भ्रूणहत्याच्या घटना अजूनही घडत असतात. या विषयावर मी "सेव्ह गर्ल” हे पहिलं चित्र काढलं.

**“सेव्ह गर्ल"**

मी आतापर्यंत या प्रकारची चित्रं काढली नव्हती. माझ्यासाठी अशी वेदनादायक चित्रं काढणे हे अत्यंत अवघड होते. कारण हे सर्व विषय Serious आणि Sensitive आहेत. हे विषय हाताळताना सगळ्यात महत्वाच अंग म्हणजे - त्यातील वेदना समजून ती Abstract Form मध्ये मांडण. तीन महिने रात्रंदिवस सतत माझे मन चित्रांतील रंग, रंग-संगती, चित्रांमधील भाव, कुंचल्याचे फटकारे (ब्रश स्ट्रोक्स), प्रकाश योजना आणि अशा अनेक विचारांमध्ये गुंतले होते. या चित्रांसाठी मी “अॅक्रिलिक ऑन पेपर” हे माध्यम ठरविले. त्यात “व्हायब्रँट ईमोशन्स” दाखविण्यासाठी हँड-क्राफ्टेड पेपर वापरला.

मुलीच्या आयुष्यात असे हृदयद्रावक प्रसंग घडताना पाहून, त्या कुटुंबातील लोकांना मरणप्राय यातना सहन कराव्या लागत असतील. मुलीवरील अत्याचार, सामाजिक अवहेलना, राजकीय दडपशाही, शासकीय निष्क्रियता आणि आर्थिक गांजवणूक या चक्रातून पिळवटून गेलेल्या कोणाही सामान्य माणसाला स्वत:च्या आयुष्याची, स्वत:च्या नशिबाची, परिस्थितीने लादलेल्या नाकर्तेपणाची, समाजाच्या अलिप्ततेची लाज नक्कीच वाटत असेल. मला तर फक्त चित्रे काढताना एवढा मनाला त्रास झाला तर ह्या स्त्रिया ज्यांच्यावर हे अत्याचार होतात त्यांचे तर काय होत असेल ह्याची कल्पना पण करणे शक्य नव्हते.

"त्या" स्त्रीच्या भावना मी “हर्ट”, “डिप्रेशन”, “व्हॉट नेक्स्ट” ह्या चित्रातून व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. ह्या सीरीज़ मधलं पुढचं “हेल्प अस” हे चित्र. ह्या चित्रामध्ये आगीत जळणारी बाग दाखवली आहे. बागेतील फुले म्हणजे स्त्रिया आहेत ज्या आपले हात वर करुन टाहो फोडत आहेत.



**“हेल्प अस”**

मला या  सीरीज़ चा शेवट एका आशेने करायचा होता. सीरीज़ मधलं पुढचं चित्र “लाइफ इज़ ब्युटिफूल” हे अन्यायामुक्त ,स्वतंत्र, स्वच्छंद  आणि आनंदी स्त्रीचे चित्र आहे.



**“होप”**

सीरीज़ चा शेवट “होप” ह्या 7 पीस ऑईल आर्ट ने केला आहे. ह्यात सात कॅनव्हास जोडून एक छान वृक्ष तयार होतो. हा वृक्ष ह्या पृथ्वीवरील सर्व लोकांनी मिळुन उभा केलेला आहे जो  Positivity आणि Peace चे प्रतीक आहे.

भारतात असतानाच दोन संस्थांनी या चित्रांचे  प्रदर्शन आयोजित केले. दोन्ही प्रदर्शनांना अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. इथे यू.एस. ला नोव्हेंबर 2014 मधे “नॅशनल ओर्गनाइज़ेशन फॉर वूमन” ने न्यू ज़र्सी मधे हे सोलो प्रदर्शन भरविले होते. त्यानंतर डिसेंबर 2014 मधे "इंडियन कोंसुलेट" ने न्यू यॉर्क मधे हे सोलो प्रदर्शन आठ दिवसांसाठी भरविले होते. त्या प्रदर्शनास भारताचे तीन राजदूतानी भेट दिली. न्यू ज़र्सी आणि न्यू यॉर्क मधील अनेक मान्यवरांनी देखील भेट दिली. प्रदर्शनास उत्तम प्रतिसाद मिळाला. ह्याच प्रद्र्शनात इंडस अमेरिकन बॅंक ने मला ह्या आर्ट सीरीज़ साठी "ॲप्रिसिएशन ॲवॉर्ड" दिले. विशेष आभार मीडिया चे ज्यांनी हा विषय भारतात आणि इथे लोकांपर्यंत पोहोचविण्याची मदत केली.



**"इंडियन कोंसुलेट" च्या प्रदर्शनाचे उद्घाटन कोंसुल जनरल श्री ज्ञानेश्वर मुळे आणि राजदूत गौरी शंकर गुप्ता यांच्या हस्ते करताना**



**भारताच्या पूर्व-राजदूत सौ. निरूपमा राओ यांची प्रदर्शनास भेट**



इंडस अमेरिकन बँक तर्फे "ॲप्रिसिएशन ॲवॉर्ड" घेताना

"Women's Rights and Empowerment" सीरीज़ काढतानाचा माझा प्रवास स्वत:साठी एक फार वेगळा अनुभव होता. प्रत्येक चित्र पूर्ण झाल्यावर "Sense of Satisfaction" पेक्षा "Sense of Realization" ची भावना जास्त होती.

स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांची आणि त्यांच्या वेदनांची जाणीव करून देण्यासाठी हा माझा छोटासा प्रयत्न !

(ही सर्व चित्रं माझ्या वेब साईट www.diptiarts.net वर बघता येतील)!

- **सौ. दिप्ती कुलकर्णी – देशमुख**

**d_for_dipti@yahoo.com**

(पूर्वप्रसिध्दी : 'रंगदीप' २०१४)